


# आयुष्मान सहकार

**समग्र आरोग्य सेवा पायाभूत सुविधा, शिक्षण आणि सेवांकरिता सहकारी संस्थांना आर्थिक मदतीसाठी एनसीडीसीची योजना**

www.ncdc.in

## रा.स.वि.नि

राष्ट्रीय सहकारी विकास निगम (एनसीडीसी) ही भारत सरकारने १९६३ मध्ये संसदेच्या अधिनियमांतर्गत स्थापन केलेली सर्वोच्च स्तरीय वैधानिक स्वायत्त संस्था आहे. हे उत्पादन, प्रक्रिया, विपणन, साठवण, निर्यात व शेतीमालाचे उत्पादन, खाद्यपदार्थ, औद्योगिक वस्तू, पशुधन, अन्य काही वस्तू, रुग्णालय व रुग्णसेवां सारख्या सेवांसाठी कार्यक्रमांचे नियोजन व प्रोत्साहन या उद्देशाने स्थापन केले आहे. हे प्राथमिक, जिल्हा आणि सर्वोच्च / बहु-राज्य, या तिन्ही स्तरांवर सहकारी संस्थांना आर्थिक सहाय्य देते. एनसीडीसी भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आहे.

एनसीडीसी ही एक आर्थिक पॉवर हाऊस म्हणून उदयास आली आहे जी ग्राहक (Client) सहकारी समित्यांना विविध उत्पादने आणि सेवा पुरवणारी संस्था आहे. ही एक आयएसओ 9001: 2015 प्रमाणित संस्था आहे.

एनसीडीसी त्याच्या प्रादेशिक कार्यालये किंवा नवी दिल्लीतील प्रमुख कार्यालय यांच्यामार्फत मूल्यमापन आणि मंजुरीची सोपी, वेगवान आणि मजबूत प्रणाली अनुसरण करते. सहकारी संस्थांची ही सर्वात प्राधान्य असणारी वित्तीय संस्था आहे.

## आयुष्मान सहकार

भारत सरकारच्या कृषी, सहकार आणि शेतकरी कल्याण विभाग, कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या राजपत्र अधिसूचनेनुसार एनसीडीसी कायद्यांतर्गत रुग्णालय, आरोग्य सेवा आणि शिक्षण या अधिसूचित सेवा आहेत. एनसीडीसी अधिसूचित सेवांसाठी आर्थिक सहाय्य करते.

> “ एनसीडीसीच्या सहकार्याने सहकारी संस्था आयोजित
> प्राथमिक, माध्यमिक व तृतीयक आरोग्य सेवा संस्था
> लोकांची यशस्वीरीत्या सेवा करीत आहेत. ”

## उद्देश्य

माननीय पंतप्रधानांनी 15 ऑगस्ट 2020 रोजी राष्ट्रीय डिजिटल आरोग्य अभियान सुरू केले. यामुळे भारताच्या आरोग्य क्षेत्रात नवीन क्रांती होईल आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उपचार घेताना येणाऱ्या अडचणी कमी होण्यास मदत होईल.

राष्ट्रीय आरोग्य धोरण 2017 वर लक्ष केंद्रित करून स्वत: ला संरेखित करणे, ज्याचा उद्देश आरोग्य प्रणालींना त्याच्या सर्व आयामांमध्ये आकार देणे - आरोग्यामधील गुंतवणूक, आरोग्य सेवांचे आयोजन, रोगांचे प्रतिबंधन आणि विविध घटक क्रियांच्या माध्यमातून चांगल्या आरोग्यास प्रोत्साहन, तंत्रज्ञानात प्रवेश, मानवी विकास संसाधने, वैद्यकीय बहुलपणास प्रोत्साहित करणे, ज्ञानाचा आधार तयार करणे, चांगल्या आर्थिक संरक्षणाची रणनीती विकसित करणे, नियमन आणि आरोग्य आश्वासन बळकट करणे आणि सर्वांना परवडणारे आरोग्य सेवा पुरविण्यासाठी सर्वसमावेशक दृष्टिकोन असणे आवश्यक आहे - रुग्णालये, आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण, नर्सिंग शिक्षण, पॅरामेडिकल एज्युकेशन, हेल्थ इन्शुरन्स आणि आयुष सारख्या समग्र आरोग्य यंत्रणेत समाकलित होणे असे निर्देशनास आले आहे की पतपुरवठा उपलब्ध नसल्यामुळे, अनेक सहकारी रूग्णालयांना एमबीबीएस, बीडीएस, बीएएमएस, बीएचएमएस, बीपीटी आणि बीयूएमएस आणि पीजी / डीएनबी प्रोग्राम्स देणारी महाविद्यालये यासह वैद्यकीय शिक्षणाच्या नवीन बाबी सुरू करण्यास अडचण येते. त्यानुसार एनसीडीसीने आयुषमान सहकार योजना सुरू केली.

**योजनेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत:**

अ) सहकारी संस्था द्वारे रुग्णालये / आरोग्य सेवा / शैक्षणिक सुविधांद्वारे परवडणारी व सर्वांगीण आरोग्य सेवा पुरविण्यास सहाय्य करणे,

ब) सहकारी संस्थांकडून आयुष सुविधांना चालना देण्याकरिता सहाय्य करणे,

क) राष्ट्रीय आरोग्य धोरणाचे उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी सहकारी संस्थांना सहाय्य करणे,

ड) राष्ट्रीय डिजिटल आरोग्य अभियानात सहकारी संस्थांना सहाय्य करणे,

इ) सहकारी संस्थांना सहाय्य करण्यासाठी शिक्षण, सेवा, विमा आणि उपक्रमांशी संबंधित सर्वकष आरोग्य सेवा प्रदान करणे.

"राष्ट्रीय स्तरावरील धोरणात प्रत्येक स्तंभात दर्जेदार आरोग्य सेवा असेल अशा निरोगी भारत घडविण्याच्या आमच्या प्रयत्नात ऐतिहासिक क्षण टिपण्याचा प्रयत्न केला गेला आहे."

माननीय पंतप्रधान, श्री नरेंद्र मोदी

## आयुष्मान सहकार अंतर्गत राबवलेले उपक्रम

1) **<u>पायाभूत सुविधा:</u>** निर्मिती, आधुनिकीकरण, विस्तार, दुरुस्ती, रुग्णालयाच्या नूतनीकरणासाठी, आरोग्य सेवा आणि शैक्षणिक करिता पायाभूत सुविधा –

**अ) सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधासाठी :**

- i) रुग्णालय आणि / किंवा वैद्यकीय / आयुष / दंत / नर्सिंग / फार्मसी / पॅरामेडिकल / फिजिओथेरपी महाविद्यालये यूजी आणि / किंवा पीजी प्रोग्राम चालविण्यासाठी,
- ii) योगा कल्याण केंद्र,
- iii) आयुर्वेद, अलोपॅथी, युनानी, सिद्ध, होमिओपॅथी इतर पारंपारिक औषध आरोग्य केंद्रे,
- iv) वृद्धांसाठी आरोग्य सेवा,
- v) उपशामक काळजी सेवा,
- vi) अपंग व्यक्तींसाठी आरोग्य सेवा,
- vii) मानसिक आरोग्य सेवा,
- viii) आपत्कालीन वैद्यकीय सेवा / आघात केंद्र,
- ix) फिजिओथेरपी सेंटर,
- x) मोबाइल क्लिनिक सेवा,
- xi) हेल्थ क्लब आणि जिम,
- xii) आयुष औषधी उत्पादन,
- xiii) औषध चाचणी प्रयोगशाळा,
- xiv) दंत निगा केंद्र,
- xv) नेत्ररचना केंद्र,
- xvi) प्रयोगशाळा सेवा,
- xvii) डायग्नोस्टिक्स सेवा,
- xviii) रक्तपेढी / रक्तसंक्रमण सेवा,
- xix) पंचकर्म / ठोककणम / क्षर सूत्र चिकित्सा केंद्र,
- xx) युनानीचे रेजिमेंटल थेरपी (इलाज बिल तडबीर) केंद्र,
- xxi) माता आरोग्य आणि बाल सेवा,
- xxii) पुनरुत्पादक आणि बाल आरोग्य सेवा,
- xxiii) एनसीडीसीने मदतीसाठी योग्य समजू शकणारी इतर कोणतीही संबंधित केंद्रे किंवा सेवा

ब) टेलिमेडिसिन आणि रिमोट सहाय्यित वैद्यकीय प्रक्रिया,

क) रसद (Logistics) आरोग्य, आरोग्य सेवा आणि शिक्षण,

ड) डिजिटल आरोग्याशी संबंधित माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान,

ई) विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आयआरडीए) द्वारा अधिकृत आरोग्य विमा



2) वरील परिच्छेद १ मध्ये नमूद केलेल्या संदर्भात दैनंदिन कामकाजा करिता आवश्यक असणाऱ्या खेळते भांडवलाच्या उभारणी करिता सिमांत राशी (Margin Money).

3) दैनंदिन कामकाजासाठी लागणारे खेळते भांडवल.

## निकष

देशातील कोणत्याही राज्य / बहु राज्य सहकारी संस्था अधिनियमान्वये नोंदणीकृत कोणतीही सहकारी संस्था, रुग्णालय / आरोग्य सेवा / आरोग्य शिक्षण संबंधित उपविधींमध्ये योग्य तरतूदीचे पालन करून व रा.स.वि.निगमच्या योजनेचे निकष पूर्ण करत असेल तर आर्थिक सहाय्या करिता योजना पात्र असेल.

एनसीडीसी अर्थसहाय्य एकतर राज्य सरकार / केंद्रशासित प्रदेश प्रशासनाद्वारे किंवा थेट अर्थसाहाय्यता निकषांची पूर्तता करणाऱ्या संस्थांना दिले जाते जे एनसीडीसीची थेट अर्थसहाय्य प्राप्त करण्याचे निर्धारित केलेले निकष पूर्ण करतात.

भारत सरकार / राज्य सरकार / इतर वित्त एजन्सींच्या इतर योजना किंवा कार्यक्रमांसह एकत्रितपणे संलग्न असेल.

## प्रकल्प किंमत

वास्तविक गरजेनुसार

## कर्जाचा कालावधी

प्रकल्पाच्या प्रकारानुसार ८ वर्षांचा असेल मुद्दलाच्या परतफेडीवर १-२ वर्षांचा मोरॅटोरियम असेल जो प्रकल्पाचा प्रकार आणि महसूल मिळविण्याच्या क्षमतेवर अवलंबून असेल.

## व्याज दर

एनसीडीसी चा व्याज दर एनसीडीसी च्या वेळोवेळी सुधारित केलेल्या परिपत्रकानुसार असतो. प्रोत्साहन म्हणून एनसीडीसी कर्जदार सहकारी संस्थेने प्रकल्प उभारणीसाठी घेतलेल्या मुदतीच्या कर्जावरील लागू दरापेक्षा 1% कमी प्रदान करेल परंतु जर संस्थेच्या महिला सदस्या कर्जाच्या संपूर्ण कार्यकाळात बहु संख्य असतील व संस्था कर्ज परतफेड वेळेवर करत असेल तरच लागू असेल.

## सुरक्षा

एनसीडीसीचे अर्थ सहाय्य राज्य सरकारमार्फत किंवा थेट सहाय्यता योजने अंतर्गत दिले जाते. थेट अर्थसहाय्य देण्याच्या बाबतीत, सहकारी संस्था एनसीडीसीच्या समाधानासाठी पुढील पैकी एक किंवा संयुक्त पद्धतीने कर्जासाठी सुरक्षा प्रदान करू शकेल:

अ) एनसीडीसी कर्जाच्या 1.5 पट मर्यादेपर्यंत प्रकल्पा अंतर्गत निर्माण होणाऱ्या मालमत्तेसह मालमत्ता गहाण ;

ब) राज्य / केंद्र सरकारची हमी;

क) एनसीडीसी कर्जाच्या 1.2 पट प्रमाणात अनुसूचित बँक / राष्ट्रीयकृत बँकांचे एफडीआर चे तारण;

ड) केंद्रीय सार्वजनिक उपक्रम / वैधानिक संस्था / केंद्रीय सार्वजनिक उपक्रमांच्या सीएसआर फाउंडेशनची हमी;

इ) अनुसूचित बँक / राष्ट्रीयकृत बँकांकडून हमी;

ई) एनसीडीसी कर्जाच्या 1.2 पट मर्यादेपर्यंत सरकारी बॉंड/सिक्युरिटीजचे हायपोथिकेशन आणि असाइनमेंट.

## अनुदान

एनसीडीसी कर्ज सहाय्य अनुदान / ग्रांट / व्हीजीएफ / भारत सरकार किंवा राज्य सरकार किंवा इतर कोणत्याही अर्थसहाय्य करणाऱ्या एजन्सीच्या इतर अन्य यंत्रणेद्वारे दिले जाणाऱ्या अर्थसहाय्यशी जोडून प्रस्तावित केले जाईल.

## अर्थसहाय्य मिळविण्याची पद्धत

प्रकल्पांना आर्थिक सहाय्य खालील पद्धतीने दिला जाईल:

### पायाभूत सुविधा निर्मिती (प्रकल्प सुविधा):

| राज्य सरकारमार्फत अर्थसहाय्याची रचना | | थेट अर्थसहाय्य |
|---|---|---|
| एनसीडीसी ते राज्य सरकार | राज्य सरकार ते संस्था | एनसीडीसी ते राज्य सरकार |
| कर्ज* - 90% | कर्ज* - 50%<br>भाग भांडवल** - 40% | कर्ज* - 90% |
| संस्थेचा हिस्सा - 10% | संस्थेचा हिस्सा - 10% | संस्थेचा हिस्सा - 10% |

* जर भारत सरकार किंवा राज्य सरकार किंवा इतर कोणत्याही निधी देणाऱ्या एजन्सीच्या योजनेंतर्गत अनुदान दिले गेले तर कर्जाची रक्कम त्याप्रमाणात कमी केली जाऊ शकते.

** जर राज्य सरकार भाग भांडवलाचा हिस्सा देत नसेल तर ते 40% संस्थेला कर्ज म्हणून दिले जाईल.

## मार्जिन मनी:

| राज्य सरकारमार्फत अर्थसहाय्याची रचना | | थेट अर्थसहाय्य |
|---|---|---|
| एनसीडीसी ते राज्य सरकार | राज्य सरकार ते संस्था | एनसीडीसी ते राज्य सरकार |
| कर्ज*<br>बँक क्रेडिट घेण्या करिता -<br>100%*** | कर्ज* किंवा भाग भांडवल किंवा कर्ज - भाग भांडवल सह<br>100%*** | कर्ज*<br>बँक क्रेडिट घेण्या करिता -<br>100%*** |

* जर भारत सरकार किंवा राज्य सरकार किंवा इतर कोणत्याही निधी देणाऱ्या एजन्सीच्या योजनेंतर्गत अनुदान दिले गेले तर कर्जाची रक्कम त्याप्रमाणात कमी केली जाऊ शकते.

*** मार्जिन मनी मदतीची पात्रता मूल्यांकनच्या अधीन आहे.

## खेळते भांडवल:

| अर्थसहाय्य राज्य सरकारमार्फत | | थेट अर्थसहाय्य |
|---|---|---|
| एनसीडीसी ते राज्य सरकार | राज्य सरकार संस्था | एनसीडीसी ते संस्था |
| आवश्यकतेनुसार कर्ज | कर्ज | कर्ज |

## योग्य खबरदारी

कोणताही प्रकल्प मंजूर होण्यापूर्वी एनसीडीसी आपली प्रमाणित मूल्यमापन पद्धत स्वीकारेल व योग्य ती खबरदारी घेईल.

इतर एनसीडीसी योजनांच्या अधिक तपशीलांसाठी, अर्थसहाय्याची पध्दत, एनसीडीसी अर्थसहाय्य मिळविण्यासाठी सामान्य निकष, सामान्य अर्ज, इत्यादींसाठी कृपया www.ncdc.in ला भेट द्या किंवा एनसीडीसी प्रादेशिक कार्यालये / मुख्य कार्यालयाचा पत्ता व संपर्कासाठी संकेत स्थळावर जा।



# आयुष्मान सहकार

राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ
कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय,भारत सरकार,
4, सिरी इन्स्टिट्यूशनल एरिया,
हौज खास, नवी दिल्ली-110016,
भारत.